# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २३/०७/२०२३ (रविवार)

---

## घरफोडी

**पोलीस स्टेशन उमरेड** :- अंतर्गत मौजा दुर्गानगरी उमरेड २ किमी पुर्व, यातील फिर्यादी हा डी, जे, वाजविणे चे व्यवसाय करतो व त्याचे सोबत ४ मुले काम करतात, फिर्यादीने सामान ठेवणे करीता दुर्गानगरी येथे किरायची रूम केली असून त्या रूममधे फिर्यादी डी,जे, चे सामान ठेवतो. दि, १२/०७/२३ रोजी सोनेझरी उमरेड येथील डी,जे, चा ऑर्डर करून रात्री ११/०० वा, सामान किरायचे घरात ठेवून कुलूप लावून घरी गेले व दिनांक १६/०७/२३ रोजी दत्तकृपा लॉन मधे ऑर्डर असल्याने सायंकाळी ५/००. वा सामान आणण्यासाठी फिर्यादी गेले असता, तेव्हा तिथे फिर्यादीला १) जुने वापरते ॲम्पलीफायर पी,डी, ५००० ज्याचा सिरीयल क्र, १९०५००९५ किंमती अंदाजे २५,०००/रू, २) व्ही ९००० कंपनीचे डिजे किंमती ३०,०००/रू, ३) डी,बी, एकस क्रॉसर कि, ४,००० /रू ४) पेटी किंमती अंदाजे ६,०००/रू, असा एकुण किंमती ६५,०००/रूपयाचा माल दिसून आला नाही. फिर्यादीने दि २२/०७/२३ पर्यंत शोध केला मिळून आला नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- सचिन भास्कर भजनकर वय २८ वर्ष रा,ईतवारीपेठ उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी विरूध्द कलम ४५४,४५७, ३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास अधिकारी पो हवा/ प्रदिप चवरे मो,न, ७७९८६६८८३८ हे करीत आहे.

## गैरकायद्याची मंडळी जमवुन जिवे मारण्याची धमकी

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :- अंतर्गत मौजा सिल्लेवाडा कॉलनी ०३ कि मी पश्चिम, दिनांक २१/०७/२३ चे २२/०० वा. यातील फिर्यादी हा महामृत्युंजय कार्यक्रम करिता गेला असता, कार्यक्रम आटोपुन घरी जात असता, यातील नमुद आरोपी यांनी संगनमत करून जुन्या वादाचे कारणावरून झगडा भांडण करून शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- संतोष श्री किशन बहुरिया वय ३० वर्ष रा चांदनी चौक सिल्लेवाडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी नामे- १) अंकीत यादव २) ईमरान खान ३) बव्वा कुरील ४) विशाल यादव ५) आकाश ठाकुर ६) अमितसिंग ७) नथ्थु प्रजापती ८) गुडडु शाहु ९) राजन सिंग १०) फारूख खान ११) रामफल प्रसाद सर्व रा. सिल्लेवाडा यांचे विरूध्द कलम १४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि राजेश पिसे पो स्टे खापरखेडा मो नं ९८८१३७७३४८ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :– अंतर्गत एचपी पेट्रोलपंप एमआयडीसी रोड बुटीबोरी ०.५ किमी पश्चिम, दिनांक २२/०७/२३ चे १२/०० वा. ते १२/३० वा फिर्यादी व त्याची लहान बहीन तनीशा हे अभ्यासाचे पुस्तके घ्यायचे होते म्हणुन फिर्यादी व त्याची लहान बहीन असे मिळुन ते त्याची ॲक्टीव्हा ६ जी एमएच ४० सी के १६७६ नी घरून बुटीबोरी करीता निघाले असता एचपी पेट्रोलपंप समोर रोडनी जात असता अचानक पणे रोडचे डाव्या बाजुला थांबुन असलेली गाय फिर्यादीचे स्कुटी समोर आल्याने फिर्यादीचे स्कुटीला गायीचा धक्का लागला फिर्यादी व त्याची बहीन दोघेही स्कुटी वरूण रोडवर पडले, अचानक त्याचवेळी मागुन भरधाव वेगाने ट्रक मिलर सिंमेट मिक्चर ट्रक क्र टी एस ०६ यु बी २१५४ चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे भरधाव वेगाने चालवुन अपघात केला असुन फिर्यादी हा किरकोळ जखमी झाला व त्याची **लहान बहीन कु. तनिशा निलकंठ कावळे, वय १७ वर्ष हीचे अंगावरूण ट्रक गेल्याने ती जागीच मरण पावली. तिचे मरणास ट्रक चालक हा कारणीभुत आहे**.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गौरव निलकंठ कावळे वय २१ वर्ष रा ड्रीम कॉलनी १ तुरकमारी ता. हिंगणा जि नागपुर मो क्र ९९२१७९४९४५ यांचे रिपोर्टवरुन पोस्टे बुटीबोरी येथे ट्रक चालकाविरूध्द कलम २७९,३३७, ३०४ (अ)भादवी सह कलम १८४ मोवाका अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि रेजिवाड पोस्टे बुटीबोरी मो क्र ९८३४८२५७९३ हे करीत आहे.

## फुस लावुन पळवुन नेणे

**पोलीस स्टेशन बोरी** :– अंतर्गत मौजा बुटटीबारी ०२ किमी. येथे दिनांक २१/०७/२३ चे ०१/०० वा. दरम्यान, यातील अल्वयीन मुलगी **वय १७ वर्ष** ही सरस्वती किसान विदयालय येथे कॉलेज ला गेली असता घरी परत आली नाही, तीला कोणीतरी अज्ञात इसमाने **फुस लावुन पळुन नेले.**

सदर प्रकरणी फिर्यादी चे तोंडी रिपोर्टवरून पोस्टे बोरी येथे कलम ३६३ भादवि अन्वयें गुन्हयाची नोंद करण्यात आली. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि रेजिवाड पोस्टे बुटीबोरी मो क्र ९८३४८२५७९३. हे करीत आहे.

## रेल्वेच्या धडकेत मृत्यु

**पोलीस स्टेशन केळवद** :– अंतर्गत मौजा खुरजगाव शिवार. येथे दिनांक २१/०७/२३ चे २१/०० वा दरम्यान, यातील मृतक नामे– शुभम रामेश्वर धुर्वे वय २६ वर्ष रा. खुरजगाव ता. सावनेर हा घरून संडास करण्याकरीता गावाजवळ असलेल्या रेल्वे पटरीकडे गेला असता, त्याला रेल्वेची धडक बसल्याने त्याचे डोक्याला, पायाला व शरीरावर इतर ठिकाणी जबर मार लागल्याने शुभम धुर्वे हा जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ईश्वर जानरावजी धुर्वे वय ३० वर्ष रा. खुरजगाव मो न ९८२३२०८४८० यांचे रिपोर्टवरून पोस्टे केळवद येथे कलम १७४ जाफौ ची नोंद करण्यात आली. सदर मर्ग चा पुढील तपास पो हवा / सूधिर पोस्टे केळवद हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**